इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-3
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नगाशा२००८/(४१८/०८)/माशि-१,
दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नगाशा२००८/(५४६/०८)/माशि-१,
दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा** सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या पैकी एक समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१८२ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

G:/GR-PS-E.lwp

Scanned with CamScanner

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८२०१९१३२४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्याक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | श्री.मुरारी विद्याप्रसारक मंडळ,मलोणी ता.शहादा | के.तापीमाई प्रायमरी स्कुल ,मलोणी ता.शहादा | इंग्रजी | १ ली |
| १३ | पुज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळ,शहादा | प्राथमिक इंग्रजी शाळा, मोहिदे त.ह(विद्याविहार) ता.शहादा | इंग्रजी | १ ली |
| १४ | कृपा प्रसाद शिक्षण संस्था,नवापूर ता.नवापूर | मारानाथा इंग्लीश मंडियम स्कुल,खांडबारा ता.नवापूर | इंग्रजी | १ ली |
| १५ | रुरल एज्यु.सासो. दातर्ती ता.साक्री जि.धुळे | उत्कर्ष इंग्लीश मंडियम स्कुल,कुकडेल परिसर ,शहादा | इंग्रजी | १ ली |
| १६ | श्री.तारकेश्वरी विद्याप्रसारक मंडळ,डामरखेडा ता.शहादा | प्राथमिक इंग्रजी शाळा,शहादा ता.शहादा | इंग्रजी | १ ली |
| १७ | श्री.धर्माबाई गिगराज अग्रवाल शैक्ष.व बहुउद्देशीय संस्था,चिंचपाडा ता.नवापूर | श्री.धर्माबाई गिगराज अग्रवाल मेमोरीयल नॅशनल पब्लीक स्कुल,वराडीपाडा तनवापूर | इंग्रजी | १ ली |
| | **जिल्हा - पुणे** | | | |
| १ | विश्व फाउंडेशन, मु.पो.वेल्हे, जि.पुणे | ड्रीम लॅण्ड इंग्लीश स्कूल वेल्हे, पुणे | इंग्रजी | १ ली |
| २ | श्री.गाडगे महाराज मिशन, मुंबई-४, विद्यार्थी भुवन, त्रिभुवन रोड, मुंबई | श्री.गाडगे महाराज इंग्लिश मेडियम विद्या मंदीर, ओतुर, ता.जुन्नर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३ | व्हिलीयन्स एज्युकेशन फाउंडेशन, १५, मर्हाह मोहल्ला, जुन्नर, पुणे | हिरा इंग्लीश मेडिअम स्कूल, खानापुर, ता.जुन्नर, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ४ | श्रीनाथ एज्युकेशन सोसायटी, वीर, पुरंदर, पुणे | इंग्लिश मिडीअम स्कूल, वीर | इंग्रजी | १ ली |
| ५ | यशवंत एज्युकेशन अॅण्ड रिसर्च अॅकेडमी, विमाननगर, पुणे-१४ | शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल, वाघापुर, ता.पुरंदर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ६ | हिंदू शेगर धनगर समाज सेवा महासंघ, रामानंद कॉम्प्लेक्स, हडपसर पुणे | एव्हरेस्ट इंग्लिश मिडीअम स्कूल गुणवडी रोड बारामती | इंग्रजी | १ ली |
| ७ | इंद्रायणी विद्या मंदीर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इंद्रायणी विद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ८ | पावा फाऊंडेशन, डॉ.आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे | श्री.संताजी विद्यालय, सुदुंबरे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ९ | श्री.बाळासो बाबुराव शेळके एज्यु. सोसा. , तपोधाम कॉलनी, तळेगाव स्टेशन, ता.मावळ, जि.पुणे | इंद्रायणी इंग्लिश स्कूल, तळेगाव स्टेशन, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १० | कै.उषाताई लोखंडे चॅरीटी ट्रस्ट, पुणे मौजे सांगिसे, ता.मावळ, जि.पुणे | प्रायमरी इंग्लिश मेडिअम स्कूल, मौजे सांगिसे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ११ | चौधरी अत्तरसिंह यादव मेमोरीयल एज्यु ट्रस्ट, प्राइड प्लाझा, डॉ.आंबेडकर पुतळाच्या मागे, पिंपरी, पुणे-१८ | सिध्दांत पब्लिक स्कूल, सुदुंबरे, मावळ, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १२ | संत तुकाराम प्रतिष्ठान, समर्थ छाया बिल्डींग, तळेगाव स्टेशन, ता.मावळ, जि.पुणे | दिगंबरशेठ भेगडे प्रायमरी स्कूल, वराळे, ता.मावळ, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १३ | श्री.शंतनु श्रीकांत शिक्षण संस्था, ढोरेनगर, जुनी सांगवी, पुणे | द न्यु डेल इंग्लिश मिडीयम स्कूल, घोटावे, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १४ | कर्तव्य प्रतिष्ठान, मु.पो.बावधन बु., ता.मुळशी, जि.पुणे | बावधन पब्लीक स्कूल, बावधन, मुळशी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १५ | श्री.साई महिला प्रतिष्ठान, विरशैव नगर, जुने सोलापूर, सोलापूर | ग्रीन व्हॅली इंटरनॅशनल स्कूल, ता.मुळशी, जि.पुणे | | |

Scanned with CamScanner

मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेला इयत्ता ८ वी या वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः MSC-२१०३९/६/२०२५-MSC-(SM-५)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक: २७.०६.२०२५

**वाचा -**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/२५८/२०१३ प्राशि-३ दि.०२.०७.२०१३,

२. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र जा.क्र./प्राशिसं/खाप्राशा/५ वी-८ वी वर्ग जोडणी/प्रशा-१ (५०१)/२४९९ दि.२५.०४.२०२५,

**शासन निर्णय-**

इयत्ता १ ली ते ७ वी इयत्ता असणाऱ्या प्राथमिक शाळेला विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन स्तरावर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | शाळेचे नाव | माध्यम | मंजूर केलेला वर्ग | मंजूर शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | ड्रिमलॅण्ड इंग्लिश स्कुल, वेल्हे, जि.पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०२५-२६ |

सदर शाळेला सन २०२५-२६ या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या पूर्ततेअधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१) शाळेतील सर्व विदयार्थ्यांच्या आधार कार्ड क्रमांकाची नोंद शाळेत व सरल पोर्टलवर ठेवावी.

२) उक्त स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मंजूर करण्यात येणाऱ्या वर्गावर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरच शिक्षक भरण्यात यावे. उक्त वर्गावर शिक्षक पदास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

३) शासन परिपत्रक दि.२४.०९.२०२४ नुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेविषयी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांची संस्थेने काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by
MAANYA MILIND KADAM
Date: 27-06-2025
13:01:21

(मान्या कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner

**प्रत,**

१) मा.मंत्री ( शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, ( शालेय शिक्षण ) यांचे स्वीय सहाय्यक
३) आयुक्त ( शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
७) निवडनस्ती-एसएम-५.

Scanned with CamScanner